दु:ख हे दुसर्यांसोबत विभागल्याने कमी होते, आणि सुख वाटल्याने अधीक वाढते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ०८ जुले २०२५ | अंक २०० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# देशात ५ टक्के गरीब असतील, तर मग ८५ टक्के जनतेला मोफत धान्य वाटण्याची वेळ का येते?

देशात गरिबी वाढत असून मोजक्याच धनदांडग्यांच्या हातात पैसा आणि संपत्ती एकवटली आहे, असे विधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले होते. या विधानानंतर आता शिवसेना ठाकरे गटाने मोदी सरकारच्या आर्थिक धोरणांवर हल्लाबोल केला आहे. देशातील वाढती गरिबी, संपत्तीचे केंद्रीकरण आणि रोजगार निर्मितीतील अपयश यावरुन ठाकरे गटाने मोदी सरकारला धारेवर धरलं आहे. देशात जर तुमच्या म्हणण्यानुसार 5 टक्केच गरीब राहिले असतील तर मग 85 टक्के जनतेला मोफत धान्य वाटण्याची वेळ तुमच्या सरकारवर का येत आहे? असा सवालही शिवसेना ठाकरे गटाने केला. 'सामना' या शिवसेना ठाकरे गटाच्या मुखपत्रातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका करण्यात आली आहे. "देशाच्या १४० कोटी लोकसंख्येपैकी १०० कोटींपेक्षा जास्त लोकांकडे फक्त किमान आवश्यक खर्च करण्याएवढेच पैसे आहेत. तर, फक्त १३-१४ कोटी लोकांकडे किमान गरजा पूर्ण करून इतर खर्च करण्याची आर्थिक क्षमता आहे. देशातील सर्वात गरीब ५० टक्के लोकांचे उत्पन्न २२.२ टक्क्यांवरून १५ टक्क्यांवर आले असून, मध्यमवर्गीयांचे उत्पन्न निम्म्यावर आले आहे आणि बचत ५० वर्षांतील नीचांकी पातळीवर पोहोचली



आहे", असे सांगत सरकारवर टीका करण्यात आली आहे. "याउलट, सरकार मात्र गरिबी कमी झाल्याचे आणि मागील १२ वर्षांत देशातील गरिबांची टक्केवारी २७.१ टक्क्यांवरून ५.३ टक्क्यांपर्यंत घसरल्याचे कागदी घोडे नाचवत आहे, असा आरोप अग्रलेखात करण्यात आला आहे. जर देशात फक्त ५ टक्केच गरीब राहिले असतील, तर ८५ टक्के जनतेला मोफत धान्य वाटण्याची वेळ सरकारवर का येत आहे?" असा सवालही अग्रलेखातून करण्यात आला आहे. देशात ना शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झाल्या, ना बेरोजगारांची संख्या "मराठवाड्यातील अंबादास पवार या वृद्ध शेतकऱ्याला बैल घेण्यासाठी पैसे नसल्याने स्वतःला औताला जुंपून घेण्याची वेळ का आली, असा सवालही सामनातून विचारण्यात आला आहे. तसेच देशातील सामान्य शेतकरी निसर्ग आणि सरकार या दोघांकडूनही तडाखे का खात आहे, शेतकरी आत्महत्या थांबायला तयार नाहीत. रविवारीच सावकाराच्या जाचाला कंटाळून बीडमधील राम फटाले या तरुण शेतकऱ्याने मृत्यूला कवटाळले. महाराष्ट्रात मागील फक्त तीन महिन्यांत 767 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. देशभरातील गेल्या 12 वर्षांतील हाच आकडा आठ हजारांपेक्षा जास्त आहे. साडेचार हजारांपेक्षा जास्त शेतमजुरांनीही स्वतःचे जीवन संपवले. देशात ना शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झाल्या आहेत, ना बेरोजगारांची संख्या", असा घणाघातही ठाकरे गटाने केला.

## टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या बीड जिल्हा कार्यकारणीची घोषणा आ. सुरेश धस जिल्हाध्यक्ष, सुशील तांबे सचिव तर अविशांत कुमकर उपाध्यक्ष

बीड ।प्रतिनिधी टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र संलग्न बीड जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनची नवी कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.या कार्यकारिणीत आष्टीचे आमदार सुरेश धस यांची जिल्हाध्यक्षपदी, राष्ट्रीय खेळाडू अविशांत कुमकर यांची उपाध्यक्षपदी, तर पाटोद्याचे क्रिकेट प्रशिक्षक डॉ. सुशील तांबे यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे.कोषाध्यक्षपदी अशोक चौरे यांची सर्वानुमते निवड झाली आहे.ही निवड भारतीय टेनिस






क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कन्हैयालाल गुजर आणि सचिव मिनाक्षी गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली बीड येथे पार पडलेल्या बैठकीत झाली. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आ. सुरेश धस यांनी सांगितले की, जिल्ह्यातील टेनिस क्रिकेट खेळाडूंना देशपातळीवर संधी मिळावी यासाठी प्रयत्न केला जाईल. प्रत्येक तालुक्यात विविध लीग स्पर्धा आयोजित करून टेनिस क्रिकेटचा चौफेर विकास साधला जाईल.

## बालग्राममध्ये आषाढी एकादशी निमित्त बालगोपालांची दिंडी!

गेवराई । प्रतिनिधी येथील बालग्राम परिवारातील बालगोपालांनी आषाढी एकादशी निमित्त वारकऱ्यांच्या वेशभूषेत दिंडी काढली. यावेळी विठू नामाच्या गजराने बालग्राम परिवार व परिसर दुमदुमला होता. पालख्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सहारा अनाथालय तथा बालग्राम परिवारातील विद्यार्थ्यांना सर्व सण, उत्सवांचा परिचय व्हावा, आपल्या संस्कृतीशी त्यांची नाळ टिकून राहावी म्हणून सर्व उपक्रम साजरे केले जातात. रविवारी सर्व बालग्राम परिवाराने मोठ्या भक्तिभावाने आषाढी एकादशी व्रत केले. सकाळी बालगोपालांची वारकऱ्यांच्या वेशभूषेत मोठ्या हर्षोल्हासात दिंडी निघाली. दिंडी दरम्यान विद्यार्थ्यांनी विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल असा गजर केला. कोणी अभंग तर कोणी गवळण घेतली. विद्यार्थ्यांनी फुगडी आणि रिंगणाचाही आनंद घेतला. टाळ, मृदंग व चिपळ्यांनी यावेळी बाळग्रामचा परिसर दुमदुमून गेला होता. बालग्राम परिवाराचे संतोष गर्जे, अधीक्षक संदीप नेहे, काळजीवाहक नंदा पवार, धम्मपाल, गोपाल, सुवर्णा यांच्यासह बालग्राममधील सर्व सहकारी यांनी दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला. पंढरीचा विठुराया जसा लेकुरवाळा आहे तसा तो सर्वांचा आहे. जात, धर्म व पंथाच्या पलीकडे जाऊन सर्वांवर मायेची पखरण घालणारा आहे. सर्वसमावेशक आहे. मानवतेशी नातं सांगणारा आहे म्हणून येणाऱ्या पिढ्यांनी विठुरायाची वारी आत्मसात केली पाहिजे असे प्रतिपादन बालग्राम परिवाराचे सर्वे सर्वा संतोष गर्जे यांनी यावेळी केले.

## शहर बचाव मंचच्या वतीने परवेज कुरेशी व गणेश बजगुडे यांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी बीड शहर बचाव मंच, जि.इंटक काँग्रेस कमिटी, लेक लाडकी अभियान समिती, बीड शहर बचाव मंचचे संचालक नितीन जायभाये, रामधन जमाले, बाजीराव ढाकणे यांनी राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या बीड तालुका अध्यक्षपदी गणेश बजगुडे तसेच बीड शहराध्यक्षपदी परवेज कुरैशी यांची फेरनियुक्ती झाल्याबद्दल हॉटेल अन्विता येथे सत्कार केला यावेळी भैय्या गोरे, हनुमंत घोडके आदी सहकारी उपस्थित होते. त्यांच्या फेरी निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ व साड्यांचे वाटप

केज । प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे व साड्यांचे वाटप करण्यात आले. तर खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन हे हिंदी भाषा सेलचे जिल्हाध्यक्ष तथा उपजिल्हा रुग्णालयाचे आरोग्य सदस्य सय्यद शरीफभाई यांनी केले होते. सय्यद शरीफभाई यांच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. हिंदी भाषा सेलचे जिल्हाध्यक्ष सय्यद शरीफभाई हे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे खंदे समर्थक व खास विश्वासू म्हणून त्यांची ओळख आहे. खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसा निमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्तदान, आरोग्य शिबिर घेण्यात आले तर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळ व साड्या, गरजू महिलांना साड्या आणि वृद्ध आश्रमातील महिलांना साड्यासहा विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी विविध मान्यवर, पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना सय्यद शरीफभाई यांच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले व खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय केंद्रे, डॉ. सचिन राऊत, डॉ. केशव इंगोले,पंचायत समिती सदस्य दत्तात्रय (पिंटू) ठोंबरे, केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, हिंदी भाषा सेलचे जिल्हाध्यक्ष सय्यद शरीफभाई, सरपंच विलास आप्पा जोगदंड, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा संजीवनी देशमुख, माजी उपनगराध्यक्ष दलीलभाई इनामदार, नगरसेवक बाळासाहेब गाढवे, गटनेते भाऊसाहेब गुंड, नगरसेविकापती ओम रांजणकर, स्वीकृत सदस्य मुस्तफा कुरेशी, माजी पंचायत समिती सदस्य बंडू चौधरी, शितल लांडगे, विमल जोगदंड, सरपंच मुकुंद कणसे, बालाजी सोनवणे, विजय अंजान, गुलाबभाई पठाण यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयाचे डॉक्टर, नर्स, ब्रदर व राष्ट्र वादी शरदचंद्र पवार पक्षाचे आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, व्हाईस चेअरमन, सदस्य, आजी माजी नगरसेवक, सर्व आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीए परीक्षेत अनिकेत लड्डा,व कांचन मालु उत्तीर्ण




माजलगाव ।प्रतिनिधी माजलगाव येथील अनिकेत लड्डा व कांचन मालू हे दोन विद्यार्थी सीए अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. शहरातील व्यापारी कमलकिशोर लड्डा यांचा मुलगा अनिकेत आहे. त्याचे दहावी पर्यंतचे शिक्षण श्री. सिद्धेश्वर विद्यालय येथे झाले.तर राजेगावचे शेतकरी कैलास मालु यांची कांचन मुलगी आहे. तीचे दहावी पर्यंतचे शिक्षण राजेगांव येथील जि.प.शाळेत झाले.या यशाबद्दल माहेश्वरी सभेच्या वतीने दोन्ही विद्यार्थीचे कौतुक करण्यात आले आहे. या सुयशा बद्दल सर्व स्तरातून या विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

## तहसीलदार व आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण! सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार यांच्या संकल्पनेतून प्राथमिक आरोग्य केंद्र हिरवेगार!

पाटोदा प्रतिनिधी सामाजिक कार्यकर्ते डॉ. हरिदास शेलार यांच्या यांच्या प्रयत्नातून वाय. व्हि.माने कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड बारामती यांचा उपक्रम दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वाय. व्हि. माने कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड बारामती यांचा मार्फत दि. ०७ जूले रोजी फळ झाडें व फुले लागवड करून पर्यावरण संरक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी कंपनीची वतीने झाडं लागवड करण्यात आली. चाळीस झाडे भेट देण्यात आले. मागील आठ दिवसांपासून सन पॉवर प्रायव्हेट लिमिटेड चे प्रकल्प समन्वयक मोहन गाडे यांच्या वतीने १२० झाडे भेट दिली होती.यांचाच भाग म्हणून



काही तरी निसर्गासाठी काहीतरी केले पाहिजे. तेजेश भैया माने यांना सुध्दा या बदल मागणी केली.निसर्गाचे संरक्षण आणि संगोपन करणे हे आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीने किमान आयुष्यात १०० झाडे लावायला पाहिजे, परंतु आजच्या काळात हे चित्र दिसत नसून पर्यावरणाचे महत्व फार कमी दिसून येते. त्यामुळे नागरिकांकडून पर्यावरण संरक्षण आणि संगोपन व्हावे. शाश्वत असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्ती पर्यावरणाचे महत्त्व लोकांना कळावे, म्हणून संन पावर प्रायव्हेट लिमिटेड व वाय व्हि माने कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड बारामती.अंतर्गत शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.पर्यावरण सप्ताह वन बीज वनस्पती, फुले, लागवड व पर्यावरण हे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक जग आहे. तहसीलदार दत्तात्रेय निलावड साहेब तालुका आरोग्य अधिकारी डॉ नरेंद्र कासट भेट दिली यावेळी डॉ.शरयू पडोळे, सय्यद कादर, सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार, शेतकरी संघटना जिल्हा अध्यक्ष भाई विष्णुपंत घोलप,मंडळ अधिकारी तोगे, तलाटी दिलीप नागरगोजे, महसूल सेवक अंगद तैरे, गणेश मस्के, प्रदिप गोरे, राहुल चव्हाण, शेख मिनाज ताई,लखन पवार, गणेश सरडे, नितेश राख .शुभम राख .अश्विनी सोनवणे, सुंदर तावरे, सुधाम रसाळवाय, व्हि.माने.कन्ट्रक्शन बारामती इंजिनीयर तेजेस भैया माने,अनिल टेकाळे,ननारी, कृष्णात भोवाळ, राजेंद्र शितोळे, जय पिसे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ०८ जुले २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## भारताचे ८ वे पंतप्रधान चंद्रशेखर..

चंद्रशेखर (१ जुलै १९२७ – ८ जुलै २००७) हे एक भारतीय राजकारणी होते.ज्यांनी १० नोव्हेंबर १९९० ते २१ जून १९९१ दरम्यानदेशाचे आठवे पंतप्रधानम्हणून काम पाहिले. जनता दलाच्या तुटलेल्या अल्पसंख्यांक सरकारचे त्यांनी नेतृत्व केले.भारतीय राष्ट्रीय काँग्र`सकडून मिळालेल्या बाहेरील पाठिंब्याने. सार्वत्रिक निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी ही व्यवस्था होती. ते पहिले भारतीय पंतप्रधान आहेत ज्यांनी कधीही कोणतेही सरकारी कार्यालय सांभाळलेले नाही.त्यांचे सरकार मोठ्या प्रमाणात निव्वळ एक कठपुतळी म्हणून पाहिले जात होते. आणि लोकसभेतील थोड्याच खासदारांसह सरकार स्थापन केले गेले होते.मूडीज, अमेरिकी आर्थिक सेवा कंपनी, यांनी भारताची ढासळलेली परिस्थिती भाकित केली होती.तेव्हा त्यांचे सरकार अर्थसंकल्प पास करू शकले नाही. या स्थिती मुळे जागतिक बँकेने भारतास आर्थिक मदत बंद केली. कर्जाची परतफेड चुकू नये म्हणुन चंद्रशेखर यांनी सोने गहाण करण्यास परवानगी दिली. ही परवानगी निवडणुकीच्या काळातच गुप्तपणे केली गेली म्हणुन विशेष टीका झाली.१९९१ चे भारतीय आर्थिक संकट आणि राजीव गांधी यांच्या हत्येमुळे त्यांचे सरकार संकटात सापडले. पूर्वीचे जीवन चंद्रशेखर यांचा जन्म १ जुलै १९२७ रोजी उत्तर प्रदेशमधील इब्राहिमपट्टी या गावात राजपूत गरीब शेतकरी कुटुंबात झाला. सतीशचंद्र पी जी कॉलेज येथे त्यांनी बॅचलर ऑफ आर्ट्स पदवी मिळविली. १९५० मध्ये त्यांनीअलाहाबाद विद्यापीठातराज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. राजकीय जीवन... हे विद्यार्थी दशेपासूनच राजकारणाकडे आकर्षित झाले आणि त्यांनी डॉ. राम मनोहर लोहिया यांच्याकडून राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. ते क्रांतिकारी उत्साह असलेले एक आगळेवेगळे आदर्शवादी म्हणून ओळखले जातात . शिक्षण पूर्ण केल्यानंतर, ते समाजवादी चळवळीत सामील झाले आणि बलिया येथील जिल्हा प्रजा समाजवादी पक्षाचे (झड्झ) सचिव म्हणून निवडून आले. लवकरच त्यांनी उत्तर प्रदेशात पक्षाचे सरचिटणीस म्हणून पदभार स्वीकारला.१९६२ मध्ये, ते उत्तर प्रदेशातून स्वतंत्र उमेदवार म्हणून राज्यसभेवर निवडून आले आणि त्यांनी संसद सदस्य म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. जानेवारी १९६५ मध्ये ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले आणि १९६७ मध्ये काँग्रेस संसदीय पक्षाचे सरचिटणीस झाले. १९६८ मध्ये, ते उत्तर प्रदेशातून काँग्रेसच्या तिकिटावर राज्यसभेवर पुन्हा निवडून आले.१९६९ मध्ये त्यांनी दिल्लीतून प्रकाशित होणाऱ्या मयंग इंडियनफया साप्ताहिकाची स्थापना आणि संपादन केले . चंद्रशेखर सिंग हे त्याच्या संपादकीय सल्लागार मंडळाचे अध्यक्ष होते. आणीबाणीच्या काळात मयंग इंडियनफ बंद करण्यात आले आणि फेब्रुवारी १९८९ मध्ये त्याचे नियमित प्रकाशन पुन्हा सुरू झाले.२ मार्च १९७७ रोजी, बलिया येथून लोकसभेवर निवडून आल्यानंतर त्यांनी राज्यसभेचा राजीनामा दिला. १९७७ ते २००४ पर्यंतच्या सर्व लोकसभा निवडणुका त्यांनी जिंकल्या, १९८४ ची निवडणूक वगळता.काँग्रेस पक्षाचे राजकारणी असूनही, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अंतर्गत सुरक्षा कायद्याअंतर्गत लादलेल्या आणीबाणीच्या काळात त्यांना पटियाला तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगवासाच्या काळात त्यांनी ममेरी जेल डायरीफ या शीर्षकाखाली प्रकाशित झालेली एक डायरी लिहिली.त्यांनी काँग्र`स सोडली आणि जनता पक्षात सामील झाले ज्याने १९७७ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीनंतर मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले.चंद्रशेखर तेव्हा जनता पक्षाचे अध्यक्ष होते.१९८० आणि १९८४ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुका जनता पक्षासाठी फलदायी ठरल्या नाहीत. १९८४ मध्ये जनता पक्षाने व्ही.पी. सिंह यांच्या नेतृत्वाखाली युती सरकार स्थापन केले. तथापि, चंद्रशेखर यांचे युतीशी असलेले संबंध बिघडले आणि त्यांनी जनता दल समाजवादी गटाची स्थापना केली.१९८३ मध्ये, त्यांनी ६ जानेवारी १९८३ ते २५ जून १९८३ पर्यंत कन्याकुमारी ते नवी दिल्ली येथील राजघाट (महात्मा गांधींची समाधी) पर्यंत सुमारे ४२६० किमी अंतर कापून पदयात्रा (मॅरेथॉन वॉक) काढली, ज्यामुळे जनतेशी संबंध पुन्हा निर्माण झाले आणि त्यांच्या समस्या समजून घेतल्या.राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या पाठिंब्याने त्यांनी नोव्हेंबर १९९० मध्ये पंतप्रधान व्ही. पी. सिंह यांना पदच्युत केले. त्यांनी ६४ खासदारांच्या आणि विरोधी पक्षनेते राजीव गांधी यांच्या पाठिंब्याने विश्वासदर्शक ठराव जिंकला आणि भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. १० नोव्हेंबर १९९० ते २१ जून १९९१ पर्यंत त्यांनी भारताचे ८ वे पंतप्रधान म्हणून काम पाहिले. चंद्रशेखर सिंग: वैयक्तिक आयुष्य चंद्रशेखर सिंग यांनी दुजा देवीशी लग्न केले आणि त्यांना दोन मुले झाली – पंकज शेखर सिंग (मोठा) आणि नीरज शेखर (धाकटा). मृत्यू ८० व्या वाढदिवसाच्या आठवडाभरानंतर चंद्रशेखर यांचे ८ जुलै २००७ रोजी निधन झाले.

# खाजगी कंपन्यांना वीज पुरवठ्याचा परवाना देण्याच्या धोरणा विरोधात महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनचा संपाचा इशारा.

### महावितरण कंपनीने समांतर वीज परवाना मागितला

खाजगीकरण धोरणाचा पाठपुरावा करणाऱ्या महावितरण व्यवस्थापनेनेही मुंबई शहरातील कुलाबा, माहीम, बांद्रा, दहिसर असे एकूण १३ क्षेत्रात वीज वितरणासाठी परवाना अर्ज दाखल केला आहे. महावितरणकडे या ठिकाणी कोणतीही पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच महावितरणच्या अखत्यारित असलेल्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमध्ये अपुरे कर्मचारी, मेंटनसला लागणारे अपुरे साहित्य यामुळे महावितरण कंपनीतील विविध झोन, सर्कलमधील कामगार कर्मचारी व अधिकारी वीज ग्राहकांना वेळेवर सेवा देऊ शकत नसल्यामुळे अगोदरच त्रस्त आहेत. महावितरण कंपनीने प्रथम आपले घर व्यवस्थित सांभाळावे मग दुसऱ्याच्या घरात पाहण्याचा प्रयत्न करावा म्हणून या खाजगीकरणाच्या धोरणास मान्यता देण्यात येऊ नये असे महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनने म्हटले आहे.

### टोरेंट पॉवर कंपनीला १६ शहरांचा ताबा

महावितरण कंपनीला सर्वात जास्त महसूल देणाऱ्या नागपूरसह १६ शहरांकरिता टोरेंट पॉवर कंपनीने समांतर वीज परवाना मागितला असून अदानी कंपनीने पुणे, पिंपरी चिंचवड, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, ठाणे यासह अनेक प्रमुख शहरांसाठी वीज वितरण परवान्याचा अर्ज वीज नियामक आयोगाने ग्राह्य धरला असून एकंदरीत वीज वितरण कंपनी वीज ग्राहकांच्या लुटीसाठी महाराष्ट्र शासनाने खाजगी कॉर्पोरेट घराण्यांना देण्याचा चंग बांधलेला आहे म्हणूनमहाराष्ट्र वीज उद्योगातील कामगार, कर्मचारी व अभियंते अधिकाऱ्यांच्या सर्व संघटनांनी व कामगार कर्मचाऱ्यांनी या खाजगीकरणाच्या विरोधात दिनांक ०९.०७.२०२५ रोजी राज्यव्यापी संपाची जोरदार तयारी करावी असे आवाहन महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनने केले आहे.

महाराष्ट्र शासन वीज नियामक आयोग व महावितरण कंपनी व्यवस्थापनेने महाराष्ट्रातील वीज वितरण व्यवस्था खाजगी कंपन्यांना हस्तांतरित करण्याच्या हालचाली करत आहे या धोरणास म हाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनचा तीव्र विरोध आहे. शासनाच्या या धोरणामुळे शेतकरी, सामान्य वीज ग्राहक, छोटे उद्योगधंदे यांना मिळणारी सबसिडी बंद होऊन भविष्यामध्ये विजेची प्रचंड दरवाढ होऊ घातली आहे. शासनाचे सदरील धोरण हे सामान्य जनतेच्या हिताचे नसून केवळ मोठमोठ्या भांडवलदारांना प्रचंड नफा मिळवून देण्याचे शासन धोरण आहे. समांतर वीज परवाना, स्मार्ट मीटर योजना, २०० कोटी रुपयांच्या वरील पारेषणचे प्रकल्प ढइउइ पद्धतीने देणे, ही सर्व धोरणे महावितरण व पारेषण कंपनीचे खाजगीकरण आहे. या खाजगीकरणाच्या विरोधात दिनांक ०९.०७.२०२५ रोजीच्या राज्यव्यापी संपाने विरोध करण्याचा महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनने ठाम निर्धार केला आहे. या संपामध्ये महाराष्ट्र राज्य वीज कृती समितीने संपाची नोटीस दिली असून ७६००० हजार कर्मचारी/ अभियंते या संपामध्ये सहभागी होणार आहेत.

### खाजगी कंपन्यांचे दावे

नागपूरच्या तीन विभागामध्ये, औरंगाबाद व जळगाव या तीनही ठिकाणी खाजगी कंपन्यांना वीज वितरण कार्यक्षम पद्धतीने करता न आल्याने फ्रेंच्यायशी धोरणाचा प्रयोग फसल्यामुळे त्यांनी वीज बिलाची थकबाकी वसूल न करता व वसूल केलेली रक्कम वितरण कंपनीकडे न भरता पळ काढला होता हि वास्तविकता जनता व वीज ग्राहक यांच्या स्मरणात आहे.

# पैश्यासाठी दांडी बहाद्दर ग्रामसेवकाकडून घरकूल धारकांची पीटीआरसाठी अडवणूक कामखेडा गावच्या लाभधारकांची जिल्हाधिकर्यायांकडे धाव, निवेदनाद्वारे केली तक्रार

बीड । प्रतिनिधी बीड तालुक्यातील मौजे कामखेडा येथील संबंधीत ग्रामसेवक हे गावात सतत गैरहजर राहत असल्याचा आरोप गावर्कयांनी केला आहे. दरम्यान पंतप्रधान घरकूल आवास योजनेतील लाभधारकांची पीटीआरसाठी दांडी बहाद्दर ग्रामसेवक पैश्यासाठी अडवणूक करत असल्याने अखेर याप्रकरणी तब्बल १५ लाभार्थ्यांनी जिल्हाधिकर्यायांकडे धाव घेत याची निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे शुक्रवारी (दि.४) तक्रार केली. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की कामखेडा गावातील नागरीकांना ग्रामपंचायत मधील कामे करुन घेण्यासाठी बीडमध्येच यावे लागते. सध्या खरीपाचा हंगाम चालु असतांना शेतीकरी शेतीच्या कामात व्यस्त आहेत. परंतू ग्रामपंचायतीमध्ये कायमच ग्राम सेवक दांडी मारत असल्याने शेतर्कयांसह सर्व सामान्य नागरिकांना काम धंदा सोडून ग्रामसेवकाची भेट घेण्यासाठी बीडला यावे लागते. परंतु येथे येवून सुद्धा ग्रामसेवक लोकांची भेट घेणे जाणीवपूर्वक टाळतात. सध्या पंतप्रधान घरकूल योजनेतंर्गत गोर-गरीबांचे प्रस्ताव मंजूर झाले असून त्यासाठी आवश्यक असलेल्या पीटीआरसाठी ग्रामपंचायतीमध्ये सर्व सामान्य लोक चकरा मारत आहेत. परंतु ग्रामसेवक जाणिवपूर्वक व राजकीय दबावापोटी आणि आर्थिक लाभापोटी पीटीआर संबंधीत लाभधारकांना देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचा आरोप लाभधारकांनी केला आहे.तसेच ग्रामसेवक हे मासिक सभा घेत नाहीत किंवा शासनाच्या कोणत्याही योजनेची माहिती उपसरपंच आणि सदस्यांना सांगत नाहीत व त्या बाबत ग्राम सेवक यांना विचारणा केली असता उलट-सुलट बोलून माझे कोणीही काही वाकडे करु शकत नाही. तसेच संबंधीत ग्रामसेवक हे उलट उपसरपंच व सदस्यांसह ग्रामस्थांना शासकीय कामात अडथळा केला म्हणुन तुमच्या वर खोटा गुन्हा दाखल करील अशी धमकी देत आहेत. या आगोदर गावातील ग्रामपंचायतकडे जमा झालेली घरपट्टी व इतर कराच्या रक्कमेची कशा पध्दतीने विल्हेवाट लावली अथवा कोठे खर्च केला या बाबत कसलीही माहिती देत नाहीत.तसेच गावातील ग्रामस्थ त्यांच्या जागेच्या पीटीआरची मागणी करण्यासाठी ग्रामसेवक यांच्याकडे गेल्यानंतर गावर्कयांकडे ते पैशाची म ागणी करतात व पैसे न दिल्यास उडवा-उडवीचे उत्तरे देऊन ग्रामस्थांना धमकावून परत पाठवतात असा गंभीर आरोपही निवेदनात नमुद करण्यात आला आहे. संबंधीत ग्रामसेवक हे ग्रामसभा बोलावत नाहीत व स्वातंत्र्य दिनानिमित्त किंवा प्रजासत्ताक दिना निमित्त घेण्यात आलेल्या ग्रामसभामध्ये ग्रामस्थांनी मांडलेले मुद्दे किंवा मंजुर झालेले ठरावांवर पुढे ग्रामसेवक हे कसलीही कार्यवाही करत नाहीत. सदरील ठरावांना केराची टोपली दाखवण्याचे काम करत असून ग्राम सभेमधील ठरावा बाबत व त्यावर झालेल्या कार्यवाही बाबत त्यांना विचारणा केली असता संबंधीत ग्रामसेवक सांगतात की, सदरील ग्रामसभा बोलावणे व त्यामध्ये ठराव घेणे हा प्रोसिडींगचा भाग आहे, त्यावर पुढे काहीही कार्यवाही होणार नसल्याचे सांगतात. त्यामुळे संबंधीत ग्राम सेवकाची चौकशी करुन त्यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे ग्रामपंचायतीचे उपसरपंच शेख शफिक शे. महेमुद, ग्रामपंचायतीचे सदस्य शेख मुश्ताक नियाज सादेक पठाण,यांच्यासह घरकूल लाभधार शेख अन्वर रहिम, शेख मतिन, शेख अतिक, शेख ताहेर, शेख म ोईन, शेख हुमेरा, शेख कलीम, शेख इम्रान, शेख शाबेर, शेख नसीर, शेख खाजा, शेख आलीम, शेख मुबीन, शेख मझहर, यांनी केली आहे.



# बीड शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त नगर परिषद कधी करणार? – शेख युनूस यांचा सवाल

बीड (प्रतिनिधी) – बीड शहरात सध्या मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. रस्त्याच्या मधोमध बसलेल्या गुरांमुळे वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडत असून, अपघातांची संख्याही वाढू लागली आहे. शहरातील विविध भागांत गुरांचे कळप रस्त्यांवर फिरताना दिसत असून, वाहनधारक आणि पादचाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. शहरात लोकसंख्या आणि वाहनांची संख्याही दिवसेंदिवस वाढत असून, काही रस्त्यांवर अतिक्रमण झाल्याने ते आधीच अरुंद झाले आहेत. अशा परिस्थितीत मोकाट जनावरे ही आणखी एक डोकेदुखी बनली आहे. जनावरं अचानक समोर आल्यामुळे लहान-मोठे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे.



या समस्येकडे नगर परिषद मुख्याधिकारी नीताताई अंधारे मॅडम यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज आहे, असे आवाहन नागरिकांतून करण्यात येत आहे. शेख युनूस यांनी या गंभीर समस्येबाबत आवाज उठवत विचारले आहे की, नगर परिषद मोकाट जनावरांचा बंदोबस्त कधी करणार?

नागरिकांचा संताप वाढत असून, जनावरांसाठी स्वतंत्र गोठा, शहरी भागातून हटविण्यासाठी मोहिम आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी निश्चित करून योग्य उपाययोजना करण्यात याव्यात, अशी एकमुखी मागणी होत आहे. अन्यथा नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न आणखी गंभीर रूप धारण करेल.

# शालेय गणवेश ठरविण्याचे अधिकार व्यवस्थापन समित्यांकडे मात्र नियोजनात बीड झेडपीची नुसतीच लुडबुड!

## शालेय गणवेश ठरवण्याचा अधिकार समित्यांना द्या; कामखेड्याच्या उर्दु माध्यमाच्या शालेय समितीची मागणी

बीड । प्रतिनिधी मागील वर्षी शालेय गणवेश वाटपात झालेला गोंधळ लक्षात घेता यंदा शासना ऐवजी प्रत्येक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीला पूर्वीप्रमाणे गणवेश वाटपाचे अधिकार दिले आहेत. हीच समिती गणवेशाचा रंगही ठरवणार आहे. मात्र बीड झेडपीने यात नाक खूपसुन नुसतीच लुडबुड चालवली आहे. यामुळे शिक्षण विभागाच्या ङ्गमीफ पणामुळे समित्यांच्या अधिकारावर गदात्तर आले असून विद्यार्थ्यांच्या शालेय गणवेश ठरविण्यासंदर्भाचा अधिकार समि त्यांना द्यावा, अशी मागणी कामखेडा येथील जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमाच्या शालेय समितीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. दरवर्षी शासनाकडून सरकारी, तसेच खासगी अनुदानित शाळांमध्ये आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिला जातो. सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात एक राज्य एक गणवेशफ ही योजना राबवण्यात आली. या योजनेमुळे शाळा स्तरावरील गणवेश खरेदी पद्धतीऐवजी राज्य पातळीवर एकच गणवेश लागू करण्यात आला. यासाठी निविदा काढून एका कंपनीला राज्यभर कापड पुरविण्याचे काम दिले गेले आणि शिलाईचे काम महिला बचत गटांकडे सोपविण्यात आले. मात्र, या योजनेमुळे विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश न मिळणे, मापाचे गणवेश न मिळणे आदी कारणांनी दिरंगाई होऊन विद्यार्थी, पालक, शिक्षक यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला. त्यामुळे ही योजना गोंधळात सापडली होती. आता शासनाची ही योजना बंद करून या योजनेच्या अंमलबजावणीचे अधिकार पूर्वीप्रमाणे शालेय व्यवस्थापन समित्यांकडे देण्यात आले आहेत. तसेच गणवेशाचा रंग आणि रचना निश्चित करण्याचे अधिकारही शाळा व्यवस्थापन समि तीला देण्यात आले आहेत.त्यानुसार गणवेशाची कापड खरेदी व रंगनिश्चिती ही कामे आता शालेय व्यवस्थापन समिती करावयाची होती. तसेच दोनपैकी एका गणवेशाची रंगनिश्चिती ही शाळा स्तरावर, तर दुर्सया गणवेशाची रंगनिश्चिती ही स्काऊट गाइड या संस्थेने करावयाची आहे. त्याप्रमाणे गणवेशांचे वाटप करण्याचे निर्देश राज्य शासनाने जिल्हा परिषदांना दिले आहेत.

परंतू बीड जिल्हा परिषदेने शालेय समि तीच्या अधिकारावर अतिक्रमण केल्याचा आरोप बीड तालुक्यातील कामखेडा येथील जिल्हा परिषदेच्या उर्दु माध्यमाच्या शालेय समितीने केला असून शाळेतील आमच्या विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार कापड व रंगसंगतीचे गणवेश ठरविण्याचा राज्य शासनाने दिलेला शाळा व्यवस्थापन समित्यांचा अधिकार हिरावून घेऊ नये. अशी मागणी कामखेडा येथील शालेय समितीचे अध्यक्ष मतिन शेख यांच्यासह समितीचे सदस्यांनी केली आहे.

### मी पणाला ब्रेक लावा:मतिन शेख

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात एक राज्य एक गणवेशफ ही योजना राबवण्यात आली. मात्र या योजनेमुळे विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश न मिळणे, मापाचे गणवेश न मिळणे आदी कारणांमुळे ही योजना गोंधळात सापडली होती. त्यामुळे शासनाने ही योजना बंद करून या योजनेच्या अंमलबजावणीचे अधिकार पूर्वीप्रमाणे शालेय व्यवस्थापन समित्यांना दिले आहेत. परंतू असे असतांनाही बीड जिल्हा परिषदेने शालेय समितीचे हे अधिकार आपल्याकडे राखून ठेवत आपले अर्थपूर्ण हित संबंध जोपासत कोण्या एका संस्थेला याचे कंत्राट देण्याचा घाट बीड झेडपीने घातल्याचे दिसत आहे. यामुळे गोरगरिबांच्या मुलांना गणवेशाचे कापड चांगल्या प्रतीचे मिळतील की, नाही यात शंका आहे. यापूर्वी गणवेशा बाबत असा प्रकार घडला होता. त्यामुळे आमच्या मुलांच्या शालेय गणवेशाचा रंग आणि रचना निश्चित करण्याचे अधिकार सीईओ जतिन रहेमान यांनी आम्हाला द्यावा व कोण्या कंत्राटदाराचे हित जोपासू पाहर्णाया शिक्षण विभागातील अधिकर्यायांच्या मी पणाला ब्रेक लावा अशी मागणी कामखेडा शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मतिन शेख यांनी केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ०८ जुले २०२५
https://lokaarambh.com



# गेवराई तालुक्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा तडाखा

## वडगाव सुशीत घरावरील पत्रे उडाले तर झाडे पडली उन्मळून ; जीवीतहानी टळली पण घरासह सौर पंपाचे मोठे नुकसान

## प्रशासनाकडून तात्काळ पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याची गरज

विनोद पौळ : गेवराई गेवराई – तालुक्यातील वडगाव सुशी येथे सोमवार दि.७ जुलै रोजी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे घराची पडझड होऊन शेतातील काही झाडे उन्मळून पडली आहेत. तर वादळी वाऱ्याचा जोर इतका प्रचंड होता की घरावरील तसेच जनावरांच्या गोठ्यावरील पत्रे देखील अर्धा किलोमीटर पर्यंत उडून गेली आहेत. तसेच काही शेतकऱ्यांच्या शेतात बसवलेली सौर पंपाचे देखील वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर जीवीत हानी टळली पण घरांसह सौर पंपाचे मोठे नुकसान झाले आहे.तरी प्रशासनाने तातडीने पंचनामे करुन नुकसान ग्रस्तांना नुकसान भरपाई द्यावी अशी



मागणी येथील नागरिकांकडून होत आहे.



बीडच्या गेवराई तालुक्यातील वडगाव सुशी येथे सोमवारी वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली. विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडली आहेत.तर प्रचंड झालेल्या वादळी वाऱ्यामुळे घरांवरची पत्रे देखील
अर्धा किलोमीटर पर्यंत अंतरावर उडून गेले आहेत. यामुळे वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसाचा चांगलाच तडाखा बसला. या वादळी पावसामुळे काही काळ जनजीवन विस्कळीत झाले होते. तरी प्रशासनाने तातडीने पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी येथील नागरिकांकडून होत आहे.

# पोलीस हक्क संघटनेच्या विदर्भ विभागीय महिला अध्यक्षपदी मनिषाताई तिरणकर यांची निवड



प्रतिनिधीयवतमाळ : संविधानिक हक्क परिषदेच्या प्रदेश अध्यक्षा मा. मनिषाताई तिरणकर यांची पोलीस हक्क संघर्ष संघटनेच्या विदर्भ विभागीय महिला अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. जेबा अब्दुल कादीर शेख यांनी ही नियुक्ती केली. मनिषाताई तिरणकर या आदिवासी समाजातील निर्भीड महिला नेत्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी यवतमाळ नगराध्यक्ष पदाची निवडणूक देखील लढविली असून विविध महिला संघटनांतून त्यांनी सातत्याने काम केले आहे. पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांच्या समस्या, तसेच त्यांच्या नातेवाईकांच्या न्यायासाठी त्यांनी यवतमाळ व वरोरा येथे काढण्यात आलेल्या मोर्चांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवला होता. पोलीस विभागातून सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्या सतत कार्यरत असतात. आरोग्य विषयक जनहितासाठी त्यांनी जिल्हा रुग्णालयाची पाहणी करून उपोषण केले होते. तसेच, जिल्हा बसस्थानक परिसरातील स्वच्छता आणि व्यावसायिकांवर नियंत्रण ठेवून प्रवाशांची लुट थांबवावी यासाठीही त्यांनी आंदोलनात्मक भूमिका घेतली. त्यांच्या या नव्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत आणि अभिनंदन होत असून, विदर्भातील महिला सशक्तीकरणासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे.

# बळीराजाच्या व्यथा मांडण्यासाठी शेतकरी सहदेव होनाळे यांची खांद्यावर नांगर घेऊन विधानभवनाकडे पायी दिंडी ; लिंबागणेशकरांचा पाठिंबा :– डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:– ( दि.०७) गेल्या आठवड्यात डोक्यावर कर्जाचा बोजा, कोळपणीसाठी पैसे नसल्याने स्वतःच्या खांद्यावर जोखड घेऊन शेती कसण्याची वेळ हडोळतीच्या ७५ वर्षीय शेतकरी अंबादास पवार यांच्यावर ओढावली. त्याचा व्हिडिओ प्रसारमाध्यमांत व्हायरल आणि विविध दैनिकात फोटोसह बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर राज्य सरकारला जाग आली आणि राज्य सरकारने त्यांना ४० हजाराची मदत देऊन दखल घेतली. जर सरकार खांद्यावर नांगर घेऊन शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचीच दखल घेत असेल तर प्रत्येक शेतकऱ्याने खांद्यावर जोखड घेऊनच शेती करायची का ? असा सवाल करत लातुर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील धानोरा बुद्रुक येथील सहदेव होनाळे हे शेतकरी दि.०४ शुक्रवार पासुन खांद्यावर नांगर घेऊन पायी मुंबईच्या विधानभवनाकडे निघाले




आहेत. काल दि.६ रविवार रोजी लिंबागणेश येथे मुक्कामी होते. आज सकाळी सोमवार रोजी लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करत त्यांच्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी यश मिळो असा शुभेच्छा देत पाठिंबा दिला.यावेळी डॉ.गणेश ढवळे, राम फाळके, हरिओम क्षीरसागर, सुनिल ढवळे ,समीर शेख, लहु घोलप, चेतन कानिटकर , नवनाथ बोराडे, अर्जुन घोलप,खंडु वाणी आदी ग्रामस्थ हजर होते.
सहदेव होनाळे पदवीधारक आहेत, कुटुंबात आई, पत्नी,भाऊ,मुलांसह एकुण १३ जण आहेत.३ भावंडात एकुण साडे ९ एकर शेती आहे.त्यांच्यावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.शेतीमालाला भाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात आहे.सरकारकडुन कर्जमाफी दिली जात नाही.आधारभुत किंमत योजनेसाठी नोंदणी करूनही बहुतांश शेतकऱ्यांच्या मालाची खरेदी केली जात नाही.मनरेगा अंतर्गत कामाचे पैसे मिळत नाही,एक रुपयात पिक विमा योजना सरकारने गुंडाळली आहे. मागील २-३ वर्षातील पिक विमा अजुन मिळाला नाही, सरकार शेतकरी विरोधी धोरणे राबवत असुन सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण अशी उद्विग्न प्रतिक्रिया त्यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी चर्चा करताना दिली.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

# नासक्या देहास काय सजवीसी मानवा



नासक्या देहाला काय सजवीसी मानवा,
माती मातीच होते याची अंत समयी जाणवा ॥

तोंडात सुवासिक, पण पोटात आहे कुज,
पंचमहाभूताचं भांडं, क्षणात होई भस्मसृज ॥

रंगून घेसी तनाला, आरसा भासवितो तेज,
वयाचं वार येता, जळते सौंदर्याचं मेज ॥

डोक्यावरील मुकुटही शेवटी धुळीत जातं,
राजाही जातो रिकामा, हसतं मृत्यू पाहतं ॥

देहात गुंतू नको, आत्मा शोध रे जीव,
हात जोडुनि म्हण "नाथा", विसर हा देहदंभ दिव ॥

मिरवू नको त्वचा, ना डोळ्यांचा आभास,
ज्या डोळ्यांनी पाहिलं, त्यांनाही लागतो घास ॥

काय हा अभिमान? काय ह्या देखण्या चाल?
शेवटी चिता पेटते, उरतो केवळ काळ ॥



अंगद दराडे
माजलगाव बीड
८६६८६८२६२०

# पालकमंत्री अजितदादा, बीडच्या विमानतळाईतकीच जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या धोकादायक शाळांची काळजी घ्या ; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विमान उड्डाण लक्ष्यवेधी आंदोलन :– डॉ.गणेश ढवळे

बीड :– ( दि.०७ ) बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी मंजुर केलेल्या बीड जिल्हा विकासाचा ७७५ कोटी रुपयांचा आराखडा असताना आतापर्यंत केवळ ४० लाख रुपये निधी उपलब्ध झाले असुन हा निधी बीडच्या प्रस्तावित विमानतळाच्या जागेच्या पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. दुसरीकडे बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था असुन मोडकळीस आलेल्या शाळांचे भिंती, छप्पर कोसळुन विद्यार्थी जखमी होण्याच्या घटना घडत आहेत.गेल्या आठवड्यात पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची भिंत रात्री कोसळल्याने दुर्घटना घडली नाही परंतु धारूर तालुक्यातील घागरवाडा येथील छताच्या भाग डोक्यात कोसळुन विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधांची विमानतळापेक्षा जास्त आवश्यकता असुन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विमानतळासाठी जेवढी काळजी करत आहेत तेवढीच काळजी या मोडकळीस आलेल्या धोकादायक शाळांमधील विद्यार्थ्यांची घेऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०७ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ङ्ककागदी विमानङ्क उडवत ङ्क विमान उड्डाण लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार , शेख मुस्ताक,माजी सैनिक अशोक येडे बीड जिल्हाध्यक्ष आप, रामधन ज्या बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक)आदी सहभागी होते. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री




बीड अजितदादा पवार यांना निवेदन दिले.
सविस्तर माहितीस्तव बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २४७६ शाळा असुन ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक मोडकळीस आलेल्या असुन त्याठिकाणी अध्यापन करण्यात येऊ नये अशा शिक्षण विभागाने कळिवले आहे.तर ७४९ वर्गखोल्यांची किरकोळ दुरुस्ती आणि ८५६ वर्गखोल्यांची मोठ्या दुरुस्तीची गरज आहे.तर ७८० शाळांमध्ये वीजपुरवठा नसल्याने डिजिटल शिक्षणाचा खेळ खंडोबा झाला आहे. उघड्यावर भरणाऱ्या, झाडाखाली, पत्र्यांच्या शेडमध्ये,किरायाच्या रूममध्ये भरणा-या शाळा, पावसाळ्यात गळक्या ईमारती,दारे खिडक्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधांची वानवा आहे.५५ कोटींचा प्रस्ताव २ वर्षांपासून धुळखात पडुन ५४१ वर्गखोल्यांच्या मोठ्या दुरुस्ती करीता १३ कोटी १४ लाख ६३ हजार रूपयांचा निधी आणि ५१९ धोकादायक वर्ग खोल्यांच्या बांधकाम व पत्र्यांच्या शेडमध्ये भरणाऱ्या ३८ शाळांमधील ३८ वर्गखोल्या बांधकामासाठी असे एकुण ५५ कोटी ७० लाख रुपये निधी मिळण्यासाठी प्रशासनाकडून २ वर्षांपासून प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.मात्र याकडे शासनाचे दुर्लक्ष असुन निधी देण्यात हात आखडता घेतला जात असल्याचे वास्तव दुर्दैवी आहे.




## विमान उड्डाण लक्ष्यवेधी आंदोलन.

पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना बीड जिल्ह्यातील विकासकामांपेक्षा ङ्क विमानतळाङ्कचीच चिंता... जिल्हा विकासाचा ५७५ कोटी रुपयांचा आराखडा असताना आतापर्यंत केवळ ४० लाख रूपये निधी उपलब्ध करून विशेष म्हणजे हा निधीही चक्क प्रस्तावित विमानतळाच्या जागेच्या पाहणीसाठी... बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या शाळा खोल्या, उघड्यावरील शाळा ,अंगणवाड्या, बीड जिल्हा रुग्णालयातील कोट्यावधी रुपयांचीङ्कमाता व बालसंगोपनङ्कईमारती निधी अभावी धुळखात पडुन असुन जागेअभावी रूग्णांना जमिनीवर झोपावे लागते, वैद्यकीय महाविद्यालय यांची आवश्यकता असताना यांना निधी उपलब्ध करून न देता विमानतळाचीच चिंता असुन यांच्या निषेधार्थ व ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी मुलभूत सुविधांसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी ङ्क विमान उड्डाण लक्ष्यवेधी आंदोलन दि.०७ जुलै २०२५ वार सोमवार रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणार आहे.... डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

# दहा महिने पगार नाही, पोट रिकामं – जिल्हाधिकारी साहेब, तुमच्या दारात दु:ख रडतंय, तरीही डोळे मिटलेत?

## चालकांची भूक बोलतेय, पण साहेबांना ती ऐकू येत नाही!

बीड प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य १०२ वाहन चालक कर्मचारी संघटना, बीडच्या वतीने मागील नऊ ते दहा महिन्यांपासून पगार थकीत त्यामुळे वाहन चालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात अमरण उपोषण केला आहे या निर्णयामुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेवर तणाव नाव निर्माण झाला आहे. संघटनेचे अध्यक्ष श्री. बाबुराव तावरे आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील कित्येक महिन्यांपासून १०२ रुग्णवाहिका चालकांचे वेतन अडवून ठेवण्यात आले असून, याविरोधात संघटनेने दिनांक ३० जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करत संप पुकारला होता. दरम्यान, राज्यभर १०२ रुग्णवाहिका चालकांनीही विविध मागण्यांसाठी कामबंद आंदोलन सुरू केल्यामुळे आरोग्य सेवांवर मोठा परिणाम होत आहे. याच दरम्यान सहभागी होत असल्यामुळे रुग्णसेवेत अडथळा निर्माण होऊ होऊ नये. परंतु, या मुदतीत मागण्या पूर्ण न झाल्यास दिनांक ७ जुलै २०२५ पासून पुन्हा एकदा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संघटनेने दिला होता. संघटनेच्या बीड जिल्ह्यातील सर्व तालुका प्रमुखांनी या निर्णयास




पाठिंबा दर्शवला असून, संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा देखील देण्यात आला आहे या संदर्भात जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्राद्वारे सूचित करण्यात आले आहे. स्थानिक अधिकाऱ्यांनी लक्ष घालून लवकरात लवकर वेतन अदा करावे आणि मागण्या निकाली काढाव्यात, अशी मागणी संघटनेने केली ग्रामीण रुग्णालय, चिंचवण येथून पत्रव्यवहार करून हे निवेदन सादर करण्यात आले आहे. संघटनेच्या शिष्टमंडळात श्री. जनार्धन मुह, सय्यद निगार, श्री. दत्ता ब्रोडगे, श्री. नामदय प्रका यांचा समावेश होता. या आंदोलनामुळे बीड जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता असून, प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी जिल्ह्यातील आरोग्य सेवकांकडूनही करण्यात येत आहे. गेली दहा महिन्यांपासून १०२ वाहकांना पगार मिळाली नाही यामुळे त्यांच्या तीव्र भावना सरकार विरोधात उमटताना आपल्याला पाहायला मिळत आहेत. जिल्हाधिकारी यांच्या दारात हे सर्वजण अमर उपोषणासाठी बसले आहेत पाहूया स्थानिक प्रशासन यांच्याकडे कसे पाहता जिल्हाधिकारी यांना न्याय कसा देणार हे आपण पाहूया.

बीड/महाराष्ट्र
आंतरराष्ट्रीय विशेष

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार ०८ जुलै २०२५
https://lokaarambh.com



# वाल्मीक कराड २२ जुलै रोजी दोष मुक्त होणार का ?

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडला दोष मुक्त करण्याच्या अर्जावर आणि त्यांची प्रॉपर्टी सील करण्याच्या अर्जावर देखील कोर्ट याच दिवशी निर्णय घेणार – सरकारी अभियोक्ता अँड उज्वल निकम

बीड /प्रतिनिधी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड व इतर आरोपींची मालमत्ता जप्त करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यासंबंधीची एक याचिका बीड कोर्टात सादर झाली असून, त्यावर येत्या २२ जुलै रोजी निर्णय येणार आहे. त्यामुळे वाल्मीक कराड सह सर्वच आरोपींचे लक्ष या निर्णयाकडे वेधले आहे. हे प्रकरण राजकीय घडामोडींशी संबंधित असल्याने या निर्णयाकडे राज्याचे लक्ष वेधणार आहे. या दिवशी वाल्मीक कराड ला न्यायालय दोष मुक्त करणार ? का दोषी ठरवणार ?त्यांच्या प्रॉपर्टी सील करणार ? का प्रॉपर्टी वरील जप्तीचे आदेश थांबवणार ? संतोष देशमुख यांची गतवर्षी ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली होती. त्यानंतर या प्रकरणी वाल्मीक कराडसह इतर आरोपींना अटक करण्यात आली होती. आता या आरोपींची मालमत्ता जप्त करण्यासाठी न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर सोमवारी कोर्टात सुनावणी झाली. त्यानंतर कोर्टाने या प्रकरणासह वाल्मीक कराडला दोषमुक्त करण्याच्या अर्जावर निकाल देण्यासाठी २२ जुलै ही तारीख निश्चित केली. कोर्ट त्या दिवशी आपला निर्णय देणार आह



### वाल्मीकला नाशिकच्या तुरुंगात हलवणार का ?

पत्रकारांनी यावेळी उज्ज्वल निकम यांना वाल्मीक कराडला बीडमधून नाशिकच्या तुरुंगात हलवण्यात येणार आहे का ? असा सवाल उपस्थित केला. त्यावर बोलताना ते म्हणाले, वाल्मीक कराडला नाशिक कारागृहात हलवण्याचा निर्णय तुरुंग प्रशासनाचा आहे. या प्रकरणी कोर्टात कोणताही अर्ज आला नाही. वाल्मीक सध्या बीड जिल्हा कारागृहातच आहे. वाल्मीकला कोणत्या तुरुंगात ठेवणे अधिक सुरक्षित राहील याबाबत मला माहिती नाही. हा तुरुंग प्रशासनाचा अधिकार आहे.

### वाल्मीक कराडचे वकील काय म्हणाले ?

दुसरीकडे, वाल्मीक कराडचे वकील विकास खाडे यांनी कोर्टात आपल्या अशिलाच्या चल – अचल संपत्तीला लावलेले सील काढण्याची मागणी केली. आजच्या सुनावणीत आम्ही आमच्या अशिलाच्या चल – अचल मालमत्तेला लावलेले सील काढण्याची मागणी केली. आमच्या अशिलाने सदर बँक खात्यांत असणारी संपत्ती व इतर मालमत्ता ही कोणत्याही गुन्ह्यातून मिळवली नाही. या गुन्ह्याचा व त्या प्रॉपर्टीचा काहीही संबंध नाही. कोर्टात यावर युक्तिवाद झाला. याशिवाय दोषमुक्तीच्या अर्जावरही सुनावणी झाली. या दोन्ही अर्जावर कोर्टाचा निर्णय अपेक्षित आहे, असे ते म्हणाले.

### सरकारी वकील उज्ज्वल निकम काय म्हणाले?

विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी कोर्टाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना आजच्या सुनावणीची माहिती दिली. ते म्हणाले, न्यायालय वाल्मीक कराडच्या दोषमुक्ती अर्जावर येत्या २२ जुलै रोजी निकाल देणार आहे. सरकारने या प्रकरणातील आरोपींची प्रॉपर्टी जप्त करण्यासंबंधी एक अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज युक्तिवाद झाला. त्यावरही कोर्ट २२ जुलै रोजी निर्णय देणार आहे. विशेषतः या प्रकरणातील आरोपींनी आपल्या प्रॉपर्टीवर टाच आणली जाऊ नये असे अर्ज केले होते. त्यांच्या अर्जावरही २२ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.

# खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त पीएम श्री कन्या प्रशालेत वह्यांचे वाटप

बीड लोकसभा मतदार संघाचे खा. बजरंग बप्पा सोनवणे यांचा दि. ६ जुलै २०२५ रोजी वाढदिवस असतो. सर्वत्र कार्यकर्ते त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम घेवून साजरा करत असतात. याचप्रमाणे आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत दि. ७ जुलै २०२५ रोजी आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा कर्तुत्ववान खा. बजरंग बप्पा सोनवणे यांचे मित्र किशोर नाना हंबर्डे व खा. बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळाच्या वतीने गरिब व होतकरु विद्यार्थीनींना प्रशालेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक – शिक्षिका यांच्या शुभहस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले. खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथील सर्व गरिब व होतकरु विद्यार्थीनींना शैक्षणिक मदत म्हणून वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. सध्या बाजारात शालेय साहित्यांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. कन्या प्रशालेत गोरगरीब व मजुरी करुन उपजिविका करणाऱ्या पालकांच्या अनेक विद्यार्थीनी शिक्षण घेतात. गरजू आणि झोपडपट्टी भागात राहणाऱ्या घरातीलही अनेक विद्यार्थीनी आहेत. अशा विद्यार्थीनींना मोफत वह्या मिळाल्याने त्यांच्या पालकांचा खर्चाचा भार थोड्या प्रमाणात कमी होण्यास मदत होते. झोपडपट्टी भागातील विद्यार्थीनी त्यांच्या विशिष्ट चाकोरीतील आयुष्य सोडून शाळेत येतात हीच मोठी गोष्ट आहे. तरी शाळेतील विद्यार्थीनींना वह्यांचे वाटप केल्याबद्दल शाळेच्या




वतिने किशोर नाना हंबर्डे व खा. बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळाचे आभार मानण्यात आले. याप्रसंगी प्रशालेतील आदर्श शिक्षक – शिक्षिका आबासाहेब खताळ (मुख्याध्यापक), सतिश दळवी, श्रीम. सुरेखा कुटे, श्रीम. संगिता दहिफळे, सुरेश नरोड, श्रीम. स्वाती टेकाडे, श्रीम. नाजिया बागवान, भोकरे संजय, विठ्ठल जगताप, श्रीम. लतिका तरटे, राजेंद्र लाड, दत्तात्रय गाडेकर, देविदास शिंदे, आप्पासाहेब काळे, श्रीम. आशा शिंदे, श्रीम. रुक्मिण करपे, शिवाजी आव्हाड, श्रीम. अश्विनी धस, श्रीम. रोहिणी कार्ले, संतोष खंडागळे, राजेंद्र शेळके, शरद राऊत, श्रीम. धोंडे मनिषा, श्रीम. धोंडे अर्चना, चित्रकला शिक्षिका श्रीम. कोमल थेटे, संगित शिक्षिका श्रीम. सुनिता पोकळे, व्यावसायिक शिक्षक भागवत वायाळ, श्रीम. शितल जगताप, मुख्यमंत्री युवा शिक्षिका कु. अमृता जोशी तर आदर्श सेवक संतोष धोंडे, श्रीम. सावित्रा जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन देविदास शिंदे यांनी केले तर किशोर नाना हंबर्डे व खा. बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळाचे मुख्याध्यापक आबासाहेब खताळ यांनी प्रशालेच्या वतिने विशेष आभार मानून खा. बजरंग बप्पा सोनवणे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या

# श्री साईनाथ मंदिर कुसळंब येथे गुरुपौर्णिमा उत्सव

पिंपळवंडी । प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गुरुपौर्णिमेनिमित्त दि.९ व १०रोजी गुरुपौर्णिमा उत्सवाचे श्री.साईनाथ मंदिर या ठिकाणी आयोजन केले असून या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने येऊन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन हनुमंत धनवटे (पुजारी) तसेच ह.भ.प.इंद्रराज गायकवाड महाराज,ह.भ.प.गहिनीनाथ मिसाळ महाराज,ह.भ.प.मुकिंदा भराटे महाराज यांनी केले आहे.बुधवार दि.०९/०७/२०२५ रोजी सकाळी १० वा.कलशपूजन होऊन सायंकाळी ६ वाजेपर्यंत साईनाथ गुरु चिंतन व जप अनुष्ठान व गुरुमंत्र जप अखंड चालू राहील.सायंकाळी ८ ते पहाटे ४ वाजेपर्यंत सार्वजनिक हरीजागर कार्यक्रम होईल.गुरुपौर्णिमा निमित्त साईनाथ गुरुपूजन सोहळा आषाढ पौर्णिमा गुरुवार दि.१०/०७/२०२५ रोजी सकाळी ९ ते १२ तसेच गुरुवारी सकाळी पहाटे ४ ते ६ काकडा,७ ते ८ वाजता साईबाबा अभिषेक,९ ते १० साईबाबांची पालखी खंडेश्वर मंदिरात जाऊन खंडेश्वराचे व साईबाबांचे पादुका पूजन कार्यक्रम होईल.१० ते १२ वाजेच्या दरम्यान धर्मभूषण युवा किर्तनकार ह.भ.प.सुनील महाराज केकान यांचे किर्तन होईल व त्यानंतर दुपारी १ वाजता साईबाबांची आरती होऊन भाविक–भक्तांना महाप्रसाद देण्यात येणार आहे. या उत्सवाचे हे १६ वे वर्ष आहे.



वडवणी तालुक्याचे उगवते नेतृत्व सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे शेख इलियास चांद पाशा यांची मौलाना आझाद युवा मंचच्या वडवणी तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या वेळी संस्थापक अध्यक्ष शेख खलील अहेमद व मराठवाडा अध्यक्ष अरफात खान, बीड जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. त्या वेळी उपस्थित सय्यद सलमान, सय्यद अश्फाक मुन्नाभाई, शेख अयास, शेख इरफान, वाजेद मोमिन, शेख आखेब, अयुब पटेल, अली बिन मसाद, मुखीद पटेल, इम्रान पटेल,शफीक पटेल, व आदी उपस्थित होते.आपण मौलाना आझाद युवा मंचचे सामाजिक कार्य सर्व जनतेपर्यंत पोहोचवाल ही अपेक्षा. आपण आपल्या पदाचा कार्यभार सांभाळावा व मौलाना आझाद युवा मंचच्या पुढील वाटचालीस गती आणावी. आपल्या पुढील कार्यास हार्दिक हार्दिक शुभेच्छा

# घरकुलासाठी मिळणार मोफत पाच ब्रास वाळु

## महसुलमंत्र्यांची घोषणा उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्या पाठपुराव्याला यश

माजलगाव । प्रतिनिधी शासनाच्या वतीने घरकुल लाभार्थ्यांकरीता मोफत पाच ब्रास वाळु बंद करण्यात आली होती ती आता पुन्हा सुरू होणार असल्याची घोषणा महसुल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली असुन यासाठी ब्रम्हगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी उपोषण करत पाठपुरावा केला होता. त्याला यश आले आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांच्या वतीने उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचे आभार मानले जात आहेत. घरकुल



लाभार्थ्यांकरीता मोफत पाच ब्रास वाळुचे वाटप सुरू करण्यात आले होते परंतु मोठा गोंधळ व गैरप्रकार होत असल्याने सदरील वाळु देणे शासनाने बंद केले. परिणामी घरकुल लाभार्थ्यांचे बांधकाम रखडल्याने उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचेकडे अनेकांनी तक्रारी केल्यानंतर उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी याप्रश्नी शासनाचे व महसुल मंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी भर पावसात उपोषण केले. उपोषणकर्त्यांची तब्येत देखील खालावली होती. याबाबत महसुल मंत्र्यांची देखील अनिल राधे कांबळे यांनी भेट घेतली होती. याची दखल महसुलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेत विधानसभेत लक्षवेधी मांडली म्हटले की, ज्या ग्रामपंचायती मध्ये ज्या नगर पंचायतीमध्ये, ज्या भागामध्ये वाळु घाट आहेत, नदी, नाल्यांवर वाळु उपलब्ध आहे. अशा ठिकाणांहुन तहसिलदारांनी घरकुलासाठी ऑनलाईन पास जनरेट करून ती पास घरकुल लाभार्थ्यांना तलाठ्यांमार्फत घरोघरी पोहच द्यायची आणि घरकुल लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या रेती घाटावरून रेती घ्यायची तहसिलदारांनी त्याला आयडेंटीफाय करून द्यायची यातुन घरकुल लाभार्थ्यांना वाळु उपलब्ध होणार आहे. त्यामुळे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्या केलेल्या उपोषणाची दखल प्रशासनाने घेतली असल्याने शहरासह तालुका परिसरातील घरकुल लाभार्थ्यांनी अनिल राधे कांबळे यांचे आभार मानले आहेत.

# आले .वैद्यनाथ विद्यालय एसआयटीच्या जाळ्यात...?

## रणजीत देशमुखची थेट एस.पी.नवनीत कावंत कडे बोगस शिक्षक भरतीची तक्रार

परळी (प्रतिनिधी) शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आधिवेशानात बोगस शिक्षक भरती घोटाळ्यावर डखढ नेमण्याची घोषणा केली आहे. माघील काही दिवसापासून वैद्यनाथ विद्यालय परळी वै. हि शाळा बोगस शिक्षक भरती घोटाळ्यसाठी खूप चर्चेत आहे. या शाळेमध्ये १–२ नव्हे तर २० च्या जवळपास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बोगस रित्या भरण्यात आलेले आहे. जुन्या तारखेचे नियुक्त्या दाखवून व सह्या स्कॅन करून हे नियुक्त्या घेण्यात आलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर या बोगस कर्मचाऱ्यांनी थकीत वेतनच्या नावाखाली शासनाची आर्थिक फसवणूक रून लाखोचे थकीत वेतन उचलले आहे. काही शिक्षक तर शाळेत रुजू नसून पगार उचलतात. वारंवार तक्रार करून देखील शिक्षणाधिकारी व उपसंचालक कार्यालय या प्रकरणी कोणतीही दखल घ्ययला तय्यार नाहीत. मे २०१२ पासून शिक्षक भरतीवर बंदी असल्यामुळे या शिक्षकांच्य नियुक्त्या मे २०१२ पूर्वीच्या दाखविलेल्या आहेत. खर तर हे सर्व शिक्षक २०१२ पासून शाळेत कार्यरत नाहीत त याचे हि पुरावे रणजीत रणजीत देशमुख यांनी बीड अधीक्षक कार्यालयात दाखल केले आहे.या आर्थिक घोटाळ्यातील संपूर्ण अधिकारी कर्मचारी, तत्कालीन संस्थाचालक, मुख्याध्यापक यांचे बँक खाते तपासण्यात यावे. हा घोटाळा पूर्व नियोजित व संगनमताने केलेला असल्याने यात सामाविष्ठ असलेल्या सर्वांवर मोक्का अंतर्गत कार्यवाही करण्यात यावी. या आर्थिक घोटाळ्यात बनावट कागदपत्रे तय्यार करणे, बनावट स्वाक्षऱ्या करणे, बनावट शालार्थ खऊ तयार करणे, बनावट नियुक्ती पत्र देणे, बनावट मान्यता देणे, आर्थिक अनियमितता करणे, आर्थिक रक्कम स्वीकारणे (लाचलुचपत) या कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात यावा, तसेच प्रत्येक शिक्षकाचे खात्यावर जी रक्कम कोषागार कार्यालयाकडून जमा झाली आहे ती संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करणे, जो पर्यंत रक्कम वसूल होत नाही तो पर्यंत यात समाविष्ठ असलेले मुख्याध्यापक, तत्कालीन संस्था कार्यकारी मंडळ, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, झअध णछ्खढ कार्यालय अधीक्षक व वेतन अधीक्षक व शिक्षण उप संचालक यांच्या मालमत्ता जप्त करण्यात याव्यात अशी लेखी तक्रार रणजीत देशमुख यांनी पोलीस अधीक्षक बीड यांच्याकडे केली आहे. रणजीत देशमुख यांनी शिक्षण विभागाला वारंवार तक्रार करून देखील





कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. आता या सर्व गोष्टींना कंटाळून, वैद्यनाथ विद्यालयात झालेल्या बोगस शिक्षक भरतीची तक्रार दि. ०२.०७.२०२५ रोजी मा. पोलीस अधीक्षक कार्यालया बीड येथे केलेली आहे आणि वैद्यनाथ विद्यालयावर डखढ लावण्याची मागणी केली आहे. आता बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावंत या प्रकरणी

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com